वित्तीय मान्यता-
सन २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानातंर्गत (NMSA) मृद आरोग्य पत्रिका (SHC) योजना राबविण्याबाबत. (सर्वसाधारण प्रवर्ग)

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः मृदस १४१७/ प्र.क्र. २७० / १७ अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय,विस्तार,मुंबई- ४०० ०३२
तारीख: २ फेब्रुवारी, २०१८

वाचा :-

१) केंद्र शासनाने www.agricoops.nic.in या सांकेतिक स्थळावर निर्गमित केलेल्या राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानातंर्गत मृद आरोग्य पत्रिका योजनेच्या मार्गदर्शक सुचना
२) केंद्र शासनाचे पत्र क्र. १६-२/२०१५/, फर्ट युज दि. २५ आक्टोंबर, २०१७ ची पत्रे (तीन)
३) कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. मृदस १४१७/प्र.क्र.१७८ /१७ अे, दि. १०.१०.२०१७
४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं - २०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ - ३, दि. १८ एप्रिल, २०१७.

प्रस्तावना :-

राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत मृद आरोग्य पत्रिका योजनेची सुरूवात केंद्र शासनाने सन २०१४-१५ पासून सुरू केलेली आहे. सन २०१५-१६ पासून ही योजना केंद्र हिस्सा ६० टक्के व राज्य हिस्सा ४० टक्के प्रमाणात राबविण्यात येत आहे. यामध्ये राज्यातील सर्व शेतक-यांना मृद आरोग्य पत्रिकेचे वितरण करण्यात येणार आहे. मृद आरोग्य पत्रिकेच्या माध्यमातून त्यांच्या शेत जमिनीचा रासायनिक गुणधर्म स्थिती,प्रमुख अन्नद्रव्यांची पातळी व सूक्ष्म मुलद्रव्ये कमतरता स्थितीची माहिती मृद आरोग्य पत्रिकेतील अहवालानुसार शेतक-यांना पिकनिहाय खत मात्राची शिफारस देण्यात येत आहे.

केंद्र शासनाने सन २०१७-१८ साठी मंजूर केलेल्या नियतव्ययानुसार संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये रू. ३५२०.६८ लाख इतक्या रकमेच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. केंद्र शासनाने दि. २५ आक्टोंबर, २०१७ च्या पत्रान्वये मृद आरोग्य पत्रिकासाठी केंद्र हिश्याच्या पहिल्या हप्त्यापोटी रू. १०५६.२१ लाख (सर्वसाधारण प्रवर्गासाठी रू.८०२.७२ लाख, अनुसुचित जाती प्रवर्गासाठी रू. १६८.९९ लाख , अनुसचित जमाती प्रवर्गासाठी रू. ८४.५० लाख) इतकी रक्कम वितरीत केलेली आहे. त्यानुसार सन २०१७-१८ मध्ये मृद आरोग्य पत्रिका योजना राज्यात राबविण्यासाठी सर्वसाधारण प्रवर्गाची रक्कम रू.८०२.७२ लाख आणि त्या प्रमाणात राज्य हिश्श्याची रक्कम रू. ५३५.१५ लाख (एकुण रु. १३३७.८७ लाख) रकमेस वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानातंर्गत (NMSA) मृद आरोग्य पत्रिका योजनेसाठी सन २०१७-१८ मध्ये राज्यात राबविण्यासाठी केंद्र हिश्श्याच्या पहिल्या हफ्त्यापोटी सर्वसाधारण प्रवर्गाकरिता वितरीत केलेल्या रु. ८०२.७२ लाख (रूपये आठ कोटी दोन लाख बहात्तर हजार फक्त) व त्याप्रमाणात राज्य हिस्सा रू.५३५.१५ लाख (रुपये पाच कोटी पस्तीस लाख पंधरा हजार फक्त.) अश्या एकूण रु. १३३७.८७ लाख (रुपये तेरा कोटी सदोतीस लाख सत्त्याऐंशी हजार फक्त) इतक्या निधीच्या वितरणास याव्दारे वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर योजनेतंर्गत रु. १३३७.८७ लाख निधीचे, घटकनिहाय, भौतिक व आर्थिक लक्ष्य पुढीलप्रमाणे राहील :-

(रुपये लाखात)

अ.क्र	**घटक**	**भौतीक**	**दर (रुपये)**	**एकुण मंजूर नियतव्यय**	**केंद्र हिस्सा (६० %)**	**केंद्र हिस्सा वितरीत निधी (५० टक्के)**	**केंद्र हिस्सा वितरीत करावयाचा निधी**	**राज्य हिस्सा वितरीत करावयाचा निधी**
	मृद आरोग्य पत्रिका							
१	मृद नमुने विश्लेषण	११७३५६१	३०० प्रती नमुना	३५२०.६८	२११२.४१	१०५६.२१	८०२.७२	५३५.१५
सर्वसाधारण प्रवर्ग (७६ %) करिता वितरीत करावयाचा निधी							**८०२.७२**	**५३५.१५**
सर्वसाधारण प्रवर्ग - एकूण (केंद्र व राज्य हिस्सा वितरित करावयाचा निधी)							**१३३७.८७**	

३. या प्रित्यर्थ होणार खर्च सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता मंजुर केलेल्या अनुदातून भागविण्यात येऊन खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्र. डी-३
२४०२, मृद व जलसंधारण.
(००) (१०१) मृद सर्वेक्षण व चाचणी
(००) (१६) कृषी उन्नती योजना-मृदा आरोग्य पत्रिका (कें.पु.यो)
(केंद्र हिस्सा ६० %) सर्वसाधारण (२४०२ अे०४१) योजनांतर्गत
३३ - अर्थसहाय्य.

मागणी क्र. डी-३
२४०२, मृद व जलसंधारण.
(०१) (१०१) मृद सर्वेक्षण व चाचणी
(००) (१७) कृषी उन्नती योजना-मृदा आरोग्य पत्रिका (कें.पु.यो)
(राज्य हिस्सा ४० %) सर्वसाधारण (२४०२ अे०५९) योजनांतर्गत
३३ - अर्थसहाय्य.

४. सदर योजना राबविताना खालील अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे.

१) सदर योजना केंद्र शासनाच्या संदर्भाधिन मार्गदर्शक सुचनानुसार व केंद्र शासनाच्या निधी वितरीत करण्याच्या पत्रात नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार राबविण्यात यावी.

२) खर्चाचे लेखे सुव्यवस्थित ठेवुन सदर खर्चाचे लेखापरिक्षण केलेला अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास लवकरात लवकर प्रगती अहवालासह सादर करण्यात यावा.त्याप्रमाणे अनुसूचित जाती/जमाती/महिला लाभार्थ्यासाठी खर्चाचे लेखे वरील प्रमाणे ठेवण्याची जबाबदारी अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेची राहील.

३) योजनेच्या वेगवेगळ्या बाबीवरील भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल केंद्र शासनास प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करण्यात यावा. तसेच सदरचा अहवाल राज्य शासनाकडेसुध्दा पाठविण्यात यावा.

४) योजनेशी संबंधित ताळेबंद व लेखापरिक्षण जमाखर्चाच्या रकमा यांचा अहवाल अंमलबजावणी यंत्रणेने द्यावा. त्यामध्ये वर्षाच्या सुरूवातीला अखर्चित रकमा व व्याजाद्वारे मिळालेले उत्पन्न स्पष्टपणे नमुद करण्यात यावे जेणेकरून पारदर्शी स्वरूपात सदर रकमा विचारात घेता येतील व संदीग्धता राहणार नाही.

५) मृद आरोग्य पत्रिका वितरीत केलेल्या शेतकरी लाभार्थ्याची यादी ग्रामपंचायत / तालुका कार्यालये/ पंचायत समिती / जिल्हाधिकारी कार्यालयात लावण्यात यावी. तसेच यादी कृषि विभागाच्या संकेतस्थळावर देखील अपलोड करण्यात यावी.

६) कोणत्याही परिस्थितीत मंजुर कार्यक्रमापेक्षा जास्तीचा कार्यक्रम राबविला जाणार नाही, या बाबत कृषि संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण) कृषि आयुक्तालय, पुणे. यांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी.

५. कृषि संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य-पुणे हे योजनेचे नियंत्रण अधिकारी म्हणुन काम पाहतील व सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर निधी खर्च करताना विहित कार्यपद्धती अनुसरून सर्व वित्तीय कायदे/टेंडर नियमावली व नियमांचे/प्रकियेचे /वित्तीय अधिका-यांना मर्यादेत / P.W.D / मॅन्युअलचे अधिन राहून/C.V.C. तत्वानुसार / CAG च्या निर्देशानुसार/प्रचलित शासन निर्णय /नियम/परिपत्रक/ तरतुदीनुसार, बजेट व कोषागार नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अमंलबजावणी यंत्रणानी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही शासन नियम/ अधिकाराचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची राहील. त्यांनी PFMS पध्दतीने अनुदानाची जिल्हानिहाय वितरणांची कार्यपध्दती राबविणे बंधनकारक राहील.

६. प्रस्तुतचे आदेश वित्त विभागाचे परिपत्रक दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजीच्या अन्वये दिलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०३१६२२२९३३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prakash R. Kadam

Digitally signed by Prakash R. Kadam
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Agriculture And Adf Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=944e446a6b36b86a52f12def26aa74e1d37e67433a0ce27e6a2caf774b9795c6, cn=Prakash R. Kadam
Date: 2018.02.03 16:30:21 +05'30'

(प्रकाश रा. कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री (कृषि)/रा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव (कृषी) यांचे स्वीय सहाय्यक (कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
३) आयुक्त (कृषि),महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) संचालक (नि.व गु.नि.), कृषि आयुक्तालय, पुणे
५) सर्व संचालक / सहसंचालक कृषि आयुक्तालय, पुणे
६) महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर
७) सर्व विभागीय कृषि सहसंचालक
८) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१०) वित्त विभाग (व्यय-१, अर्थसंकल्प -१३), मंत्रालय, मुंबई
११) नियोजन विभाग-१४३१, मंत्रालय, मुंबई
१२) कार्यासन (२अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) निवडनस्ती